# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील गटई कामगार 'चर्मकार' यांना पीच लाईसन्स देण्याबाबत**

**(१) १५९३२ (०९-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गटई कामगार 'चर्मकार' यांना शासनाकडून देण्यात येणारे (पीच लाईसन्स) सन १९९० पासून अद्यापपर्यंत बंद असून, उक्त लाईसन्स चालू करण्याची मागणी कामगार करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पीच लाईसन्स कामगारांना पुन्हा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१८) :** (१) व (२) बृहनमुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३१३(ब) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३८५ नुसार हस्त व्यवसायातील कौशल्याचा उपयोग करण्यासाठी परवाने देण्याची तरतुद विहित आहे. याच स्वरुपाची तरतुद महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६६ मधील कलम १८७ मध्ये आहे. या तरतुदीनुसार गटई कामगारांना बैठे(पिच) परवाने देण्यासंदर्भात शासन आदेश दिनांक ०५ जून, २००० अन्वये महानगरपालिका व नगरपालिकांना सुचना दिलेल्या आहेत.

पथविक्रेता(उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन ) नियम २०१६ नुसार पथ विक्रेता समित्या स्थापन करण्याची तरतुद विहित केलेली आहे. या नियमानुसार गटई कामगार यांना बैठे परवाने देण्याबाबत महानगरपालिका व नगरपालिका स्तरावर कार्यवाही अभिप्रेत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## जळगाव जिल्ह्यामध्ये शासनाच्या घरकुल योजनांमध्ये अंध व अपंगांना आरक्षण दिले नसल्याबाबत

**(२) ३९२४० (२१-०१-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यामध्ये शासनाच्या घरकुल योजनांमध्ये अंध व अपंगांना आरक्षण दिले नसल्याचे नुकतेच आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून अंध व अपंगांना घरकुल योजनेमध्ये आरक्षण मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१८) :** (१) होय.

(२) शासनाच्या घरकुल योजनांमध्ये अंध व अपंगांना आरक्षण देण्याबाबत जळगांव जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, केंद्र शासनाच्या सर्वांसाठी घरे या योजनेची जळगाव महानगरपालिका क्षेत्रात अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत निकष पुर्ण करणाऱ्या अंध व अपंग व्यक्ती यांचा देखील योजनेत समावेश करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी स्वस्त दरात घरे उभारण्याची योजना

**(३) ७००२८ (१६-०१-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी स्वस्त दरात घरे उभारण्याची योजना प्रशासनातील नियोजनाचा अभाव आणि महानगरपालिकेकडूनच नियमांचे उल्लंघन होत असल्याने बंद करण्यात येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर योजना अपयशी करणाऱ्या प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रस्तुत प्रकल्पाच्या २.५ चटई क्षेत्रफळाला (FSI) तसेच प्रकल्पानुषंगाने कलम ३७ मध्ये करण्यात आलेल्या बदलाबाबत दि.७.२.२०१३ रोजी याचिका क्र.१२७६/२०१३ दाखल करण्यात आली. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.८.१०.२०१३ रोजी स्थगिती आदेश दिले. परिणामी प्रकल्पाचे काम अडीच वर्षे स्थगित होते. त्यामुळे प्रकल्पास विलंब झाला आहे. दि.२९.४.२०१६ रोजी मा.उच्च न्यायालयाने स्थगिती उठविली असून प्रकरणाचा निकाल शासनाच्या व महापालिकेच्या बाजूने लागला आहे.

तथापि, सदर प्रकल्पातील आतापर्यंत ५८५० सदनिका बांधून पूर्ण झालेल्या असून त्यातील ४३२६ सदनिकांचे वाटप लाभार्थ्यांना केलेले आहे. जेएनएनयुआरएम अभियानाची मुदत दि.३१.३.२०१७ रोजी संपुष्टात आली आहे.

---

## आष्टी व कारंजा (घा) (जि.वर्धा) तालुक्यात पंतप्रधान आवास योजनेतंर्गत घरकूल योजना मंजूर करण्याबाबत

**(४) ९१४७४ (०१-०९-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी व कारंजा (घा) (जि.वर्धा) तालूक्यात समावेश असून या तालूक्याच्या ठिकाणी नगरपरिषद आणि नगरपंचायत स्थापना झालेली असून अनेक गरीब व मध्यम वर्गीय नागरीकांजवळ हक्काचे घर नसल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी पंतप्रधान आवास योजनेतंर्गत घरकूल योजना मंजूर करून नागरीकांना त्यांचे हक्काचे घरकुल मिळण्याबाबत मागणी करणारे लेखी निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयास दिनांक १७ जून, २०१७ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

आर्वी (जि.वर्धा) विधानसभा मतदार संघातील गरजू लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकूल मंजूर करण्यासंदर्भात मा. श्री.अमर शरदराव काळे, वि.स.स. यांनी दि.१७ जून,२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन सादर केले आहे. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, आर्वी नगरपरिषदेचा प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत समावेश करण्यात आला असून, सदर योजनेंतर्गत किमान २ प्रस्ताव सुकाणू अभिकरण म्हाडास सादर करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या असल्याचे मा.विधानसभा सदस्य यांना
दि.२० जानेवारी,२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच वर्धा जिल्हयातील आष्टी (वर्धा) या शहराचा देखील प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार योजनेच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन शहर कृती आराखडा तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल सुकाणू अभिकरण म्हाडाकडे सादर करणे इ.बाबत संबंधितांना दि.१२.१०.२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यात नव्याने समाविष्ट गावांसाठी अर्थशीर्ष तयार करण्याचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(५) ९५१८५ (०१-०१-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यात नव्याने समाविष्ट गावांसाठी अर्थशीर्ष तयार करण्याचे काम संथ गतीने सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्याने समाविष्ट गावांसाठी अर्थसंकल्पातून ठराविक तरतूद करण्यासाठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री तसेच महापौर, आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समाविष्ट गावांतील वाढते नागरीकरण आणि सोयीसुविधांची कमतरता यामुळे गावांतील रहिवाश्यांची अतिशय गैरसोय होत असतांना महानगरपालिका प्रशासनाकडून तरतूद करण्यासाठी अर्थशीर्ष तयार करण्याचे काम संथ गतीने सुरु असल्याने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) पुण्यात नव्याने समाविष्ट गावांसाठी अर्थशीर्ष तयार करण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून याबाबत महापौर, पुणे महानगरपालिका यांनी स्थायी समिती पुणे महानगरपालिका यांना नव्याने समाविष्ट गावांसाठी योग्य त्यास मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात रु.१०० कोटी वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्याबाबत पत्र दि.१७/१०/२०१७ रोजी पत्र पाठविलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील ८९ हजार मिळकती कर आकारणीविना असल्याबाबत**

**(६) ९५३६९ (०१-०१-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने जीआयएस मॅपिंग या प्रणाली अंतर्गत शहरातील तीन लाखांहून अधिक मिळकतींच्या केलेल्या सर्व्हेक्षणात शहरातील ८९ हजार मिळकती कर आकारणीविना असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरातील मिळकतींचे सर्व्हेक्षणाचे काम सार आयटी प्रायव्हेट लिमिटेड आणि सायबर टेक सिस्टिम अ‍ॅण्ड सॉफ्टवेअर लिमिटेड या खासगी एजन्सीमार्फत संथ गतीने सुरू असून महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या मोबदल्याच्या अनुषंगाने ३० टक्के कामसुद्धा एजन्सीने केले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी ८९ हजार कर आकाराणीविना मिळकती आणि संथ गतीने काम करणाऱ्या एजन्सीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१), (२) व (३) • पुणे महानगरपालिकेचे मालमत्ता कराची आकारणी करण्यासाठी जी.आय.एस. व जी.पी.एस. प्रणालीचा वापर करुन झोन क्र.१,३,व ४ मधील मिळकतींचे

• सर्वेक्षण करण्याचे काम सार आयटी रिसोर्सेस प्रा.लि. या कंपनीस सोपविण्यात आले आहे.

• सुमारे ३,९०,५०८ मिळकतींचे सर्व्हेक्षण झाले असून त्याची माहिती खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| व्हेरिएशन असलेल्या एकूण मिळकती | ७५,३९७ |
| व्हेरिएशन नसलेल्या एकूण मिळकती | ३,१५,१११ |

• या कामाचे कार्यादेश दिनांक २४/६/२०१६ रोजी देण्यात आलेले होते तथापी जीआयएस सर्वेक्षण प्रणाली विकसीत करण्याचे कामाकाज पुर्ण झाले नव्हते. सदर प्रणाली दिनांक २२/१०/२०१६ रोजी पुर्ण झाली.

• कार्यादेशातील अटी नुसार प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे कामकाज दिनांक १/११/२०१६ पासून सुरु झाले त्यामुळे प्रत्यक्ष कामाची मुदत सदर कंपन्यांना दिनांक १/११/२०१६ पासून पुढे ९ महिन्यांकरिता देण्यात आली.

• या प्रकरणी मुदत संपुष्टात आल्यानंतर केलेल्या कामाबाबत कंपन्यांना विहीत केलेल्या दरापेक्षा कमी दर अदा करण्यात आले आहेत.

• ज्या मिळकतींच्या सर्वेक्षणाचे कामकाज कंपन्यांनी पुर्ण केलेले आहे त्याचेच देयक अदा करण्यात आले आहे.

• कामकाज पुर्ण न झालेल्या अथवा प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या कोणत्याही मिळकतीचे कामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील तलाव नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याबाबत

**(७) ९५४७१ (३०-१२-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे शहर तसेच कळवा, मुंब्रा व दिवा येथील तलाव नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने सदर तलावांचे सुशोभिकरण करण्याचा निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी घेतलेल आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, परिसरातील नामशेष होत असलेले तलावांचे संवर्धन करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व ३७ तलावांचे संवर्धन, जतन व सुशोभिकरण करण्यासाठीच्या प्रस्तावास महासभेने मान्यता दिली आहे.

तद्नुषंगाने या प्रकरणी पुढील कार्यवाही ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा येथे प्रभाग समिती कार्यालय व कल्चरल सेंटर उभारण्याबाबत

**(८) ९५४८९ (०१-०१-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा येथील जुना स.न.१०२/अ,नवीन स.न.१०२/१/अ आणि स.न.१३४ (भाग) या जमिनींपैकी सुमारे १७५५९ चौ.मी.क्षेत्राच्या जमिनीवर प्रभाग समिती कार्यालय व कल्चरल सेंटर उभारण्यासाठी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) व (२) मौजे मुंब्रा येथील जुना स.नं.१०२/अ नवीन स.नं.१०२/१/अ यामधील सुमारे १७५५९.०० चौ.मी. जमिनीवर आ.क्र.१अ अन्वये प्रभाग समिती कार्यालय, शासकीय कार्यालय यासाठी आरक्षित करणेबाबत व या आरक्षणाकरिता स.नं.१३४ (भाग) मधून १२ मी. रुंद पोहच रस्ता दर्शविणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(२) अन्वये महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडून दिनांक १५.१२.२०१६ रोजी आरक्षण मंजूर करण्यात आलेले आहे.

तसेच सदर मंजूरीच्या अधिसूचनेमध्ये काही अटींवर सदरचे आरक्षण मंजूर करण्यात आले असून, सदर अटींपैकी अट क्र.२ नुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विशेष अनुमती याचिकेतील अंतिम निर्णयापर्यंत सदर जागेचा ताबा बाहुबली ट्रस्टकडे राहिल व बाहुबली ट्रस्टच्या विरुध्द कोणतीही कठोर कार्यवाही करण्यात येणार नाही, असे नमूद असून, सद्यस्थित सदरची जमीन ही न्यायप्रविष्ठ असल्याने ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली नसल्याने आरक्षण विकसित करणेबाबतची कार्यवाही अद्याप करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ९० टक्के हॉटेल आणि बार अग्निशमन दल तसेच महानगरपालिकेच्या परवानग्या नसतांनाही सुरु असल्याबाबत**

**(९) ९५५४७ (०१-०१-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील मानपाडा परिसरातील कोठारी कंपाऊंडमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामांची उभारणी सुरु असुन लाऊंज बार, हुक्का पार्लर तसेच बड्या हॉटेलांची बिनदिक्कत उभारणी केली जात असल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास तसेच वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ९० टक्के हॉटेल आणि बार अग्निशमन दल तसेच महानगरपालिकेच्या परवानग्या नसतांनाही सुरु असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच या विभागातील अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालणाऱ्या प्रभाग अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१८) :** (१) व (२) होय, अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

मात्र या ठिकाणी ५ बार व रेस्टॉरन्ट अग्निशमन परवाना न घेता सुरू असल्याचे सप्टेंबर, २०१७ दरम्यान निदर्शनास आले.

(३) • ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने सप्टेंबर, २०१७ पासून ठाणे शहरातील ४२६ आस्थापनांची तपासणी केली असता त्यांचेकडे अग्निशमन ना-हरकत दाखला नसल्याचे आढळून आले. त्यांच्याविरुध्द नियमानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

• उर्वरीत आस्थापनांची तपासणी सुरू आहे.

• कोठारी कंपाऊंडमधील ५ बार व रेस्टॉरन्ट अग्निशमन परवाना नसल्याने महानगरपालिकेमार्फत बंद करण्यात आले होते.

• तद्नंतर संबंधित आस्थापनांच्या विनंतीनुसार अग्नि प्रतिबंधक सुरक्षा उपाययोजनांची पूर्तता करण्याच्या अटीच्या अधीन सदर बार व रेस्टॉरन्ट उघडून देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषदेच्या हद्दीतील नैसर्गिक नाल्यावर अनेक इमारतींना नगरपरिषदेकडून बांधकाम परवाने देण्यात आल्याबाबत

**(१०) ९५७३७ (०१-०१-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषदेच्या हद्दीतील नैसर्गिक नाल्यावर अनेक इमारतींना नगरपरिषदेकडून बांधकाम परवाने देण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार नैसर्गिक भराव करून बांधण्यात आलेल्या इमारतींवर, विकासकावर व बांधकाम परवानगी देणाऱ्या नगरपरिषदेच्या सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१) व (२) मंजूर विकास आराखड्यात दर्शविलेल्या नैसर्गिक नाल्यावर इमारत बांधकाम परवाने दिले नसल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

• तथापि, अशा प्रकारचे बांधकाम परवाने दिले नसल्याबाबत खातरजमा करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना नगरपरिषदेस देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंब्रा (जि.ठाणे) येथील पारसिक बोगद्याजवळील ठाणे-कल्याण जलद रेल्वे मार्गावरील ब्रिटीशकालीन पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) ९५८७९ (०१-०१-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) येथील पारसिक बोगद्याजवळील ठाणे-कल्याण जलद रेल्वे मार्गावरील ब्रिटीशकालीन पुलाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुल वाहतुकीसाठी धोकादायक झाला असून पुलावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जीवीतालाही धोका निर्माण झाला असल्याचे माहे आक्टोबर, २०१७ च्या चौथ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार उक्त पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१८) :** (१), (२) व (३) सदरचा पुल हा रेल्वेच्या अखत्यारित येत असून सदर पुलाची निगा व देखभाल रेल्वेमार्फत करण्यात येते.

सदर पुल सुस्थितीत असल्याबाबत रेल्वेने ठाणे महानगरपालिकेस दिनांक २७.०२.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत निधी उपलब्ध होऊनसुद्धा सदरील योजना प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ९७२१९ (०३-०१-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत निधी उपलब्ध होऊनसुद्धा सदरील योजना प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे अमरावती भागातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थींना घरकुल योजनेपासून वंचित राहवे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी त्वरीत दखल घेऊन या योजनेंतर्गत लाभार्थांना घरे बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केंद्र हिश्यापोटी रु.३६.९४८ कोटी इतका निधी अमरावती महानगरपालिकेस देण्यात आलेला आहे. परंतु सदरचा निधी लाभार्थ्यांना वितरीत केलेला नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

अमरावती महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्र.४ अंतर्गत एकूण ६१५८ घरकुलांच्या प्रस्तावास राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती तसेच केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (दि.२८ एप्रिल,२०१६) मान्यता दिली होती. तद्नंतर प्रत्यक्ष क्षेत्रिय पडताळणी आणि जमीनीच्या मालकी संदर्भातील कागदपत्रांच्या तपासणी अंती प्रारुप यादीमधील बहुतांश लाभार्थी पात्र ठरले नसल्यामुळे प्राप्त झालेल्या अर्जांपैकी जून, २०१७ पर्यंत एकूण ३५६१ लाभार्थी पात्र ठरले आहेत. त्यानुसार ३५६१ लाभार्थ्यांच्या घरकुलांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीने (दि.२४.१.२०१८ रोजी) आणि केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (दि.७.२.२०१८ रोजी) मान्यता दिलेली आहे. सद्य:स्थितीत लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकाम नकाशांना मंजुरी तसेच प्रत्यक्ष घरकुलांचे बांधकाम सुरु करण्याबाबत लाभार्थ्यांना पत्र वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांढरकवडा नगरपरिषदेमध्ये (जि.यवतमाळ) मुख्याधिकाऱ्यासह ११ प्रमुख पदे रिक्त असल्याबाबत

**(१३) ९९०२५ (३०-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानमध्ये राज्य स्तरावरील पुरस्कार प्राप्त पांढरकवडा नगरपरिषदेमध्ये (जि.यवतमाळ) मुख्याधिकाऱ्यासह ११ प्रमुख पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त पदामुळे शहरातील विकास कामांवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे अद्यापही न भरण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, ही पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१) पांढरकवडा नगरपरिषदेमधील मुख्याधिकारी पदावर अधिकारी कार्यरत आहे.

पांढरकवडा नगरपरिषदेचा सुधारित आकृतीबंध दि.१२.०२.२०१८ रोजी मंजूर करण्यात आला असून, त्यानुसार, १५ मंजूर पदांपैकी ९ पदे रिक्त आहेत.
(२) सदर नगरपरिषदेमधील रिक्त पदांचा कार्यभार अन्य कर्मचाऱ्यांकडे सोपवून या नगरपरिषदेची कामे सुरू आहेत.

(३) व (४) महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील एकुण १८८९ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता संचालनालयाकडून दि.०७.०४.२०१८ रोजी जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्यानुसार महापरीक्षा पोर्टल या यंत्रणेमार्फत दि.१८.०५.२०१८ ते दि.२३.०५.२०१८ या कालावधीत पूर्व परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

तसेच, दि.१३.०४.२०१७ च्या शासन निर्णयानुसार नगररचनाकार व विकास सेवा संवर्गातील एकुण ४५५ पदे नगररचना व मुल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील संबंधित संवर्गातील अधिकाऱ्यांमधून १००% प्रतिनियुक्तीने भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

**डहाणू (जि.ठाणे) नगरपरिषद क्षेत्रातील १९ इमारती धोकादायक असल्याबाबत**

**(१४) ९९४४४ (०१-०१-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.ठाणे) नगरपरषिद क्षेत्रातील १९ इमारती धोकादायक, तर ७ अतिधोकादायक इमारतीची यादी नगरपरषिदेने जाहीर केलेली असून मोडकळीस आलेल्या इमारती कोसळून दुर्घटना होण्याची भीती दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारती संदर्भात नगरपरिषद कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :**(१) डहाणू नगरपरिषदेमार्फत सन २०१७ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार त्यांच्या हद्दीतील १९ इमारती धोकादायक व त्यापैकी ७ अतिधोकादायक म्हणून घोषित केले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) डहाणू नगरपरिषद हद्दीतील धोकादायक आढळलेल्या १९ इमारतींना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये आवश्यक नोटीसा बजावण्यात आल्या आहेत व दैनिक वृत्तपत्राद्वारे या विषयी जाहिर प्रगटन करण्यात आले आहे.

तसेच शासन परिपत्रक दि. ०५/११/२०१५ रोजीच्या मार्गदर्शक सुचीनुसार अतिधोकादायक ७ इमारतींपैकी ३ इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. त्याबाबत पुन:श्च सर्व्हेक्षण करुन धोकादायक इमारतींची सद्यस्थिती तपासावी व आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई विरार शहर महानगरपालिकेने सार्वजनिक असलेल्या रस्त्यास मालकी हक्क दिल्याबाबत**

**(१५) ९९४५१ (३०-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार शहर महानगरपालिकेने सार्वजनिक असलेल्या रस्त्यास मालकी हक्क देण्याचा अधिकार नसताना श्री.नीतिन लक्ष्मण वर्तक यांचे नावे मालकी केल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या र्निणयानुसार मालकी हक्क देता येत नसतानाही मालकी हक्क देऊन न्यायालयाचा अवमान करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१८) :** (१), (२) व (३) तत्कालीन वसई नगरपरिषदेने दिनांक २७.०३.१९९७ अन्वये सर्वे क्र.७६, हिस्सा नं. ५/२ च्या जागेमध्ये जाण्यासाठीचा रस्ता नगरपालिकेच्या मालकीचा असून सार्वजनिक रस्ता असल्याचा दाखला दिला होता.

तद्नंतर वसई विरार शहर महानगरपालिकेने त्यांचे अभिलेख तपासले असता, सदरचा रस्ता खाजगी मालकीचा असल्याचे निदर्शनास आल्याने महानगरपालिकेने दिनांक १२.०४.२०१२ अन्वये वसई नगरपरिषदेने दिनांक २७.०३.१९९७ अन्वये दिलेला दाखला रद्द केला.

मौजे धोवली सं.नं. ७६, हिस्सा नं. ५/२ या जागेत सार्वजनिक रस्ता असल्याबाबत वसई विरार शहर महानगरपालिकेने दिनांक १२.०४.२०१२ रोजी दिलेल्या प्रमाणपत्रास आव्हान देणारी याचिका मा.उच्च न्यायालयाने निकाली काढली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यावल,फैजपूर,रावेर नगरपरिषदेतील ६०% कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१६) ९९८४६ (०३-०१-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल,फैजपूर,रावेर नगरपरिषदेतील ६०% कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही पदे रिक्त असल्यामुळे कार्यालयीन कामे वेळेवर पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषदांमधील रिक्त असलेली पदे तत्काळ भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१) यावल, फैजपूर व रावेर नगरपरिषदेचा सुधारित आकृतीबंध दि.१२.०२.२०१८ रोजी मंजूर करण्यात आला आहे.

सुधारीत आकृतीबंधानुसार सदर नगरपरिषदांसाठी मंजूर पदांपैकी यावल नगरपरिषदेमध्ये १५ पदे, फैजपूर नगरपरिषदेमध्ये १२ पदे व रावेर नगरपरिषदेमध्ये १५ पदे रिक्त आहेत.

(२) सदर नगरपरिषदांमधील रिक्त पदांचा कार्यभार अन्य कर्मचाऱ्यांकडे सोपवून वरील नगरपरिषदांची कामे सुरू आहेत.

(३) महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील एकुण १८८९ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता संचालनालयाकडून दि.०७.०४.२०१८ रोजी जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्यानुसार महापरीक्षा पोर्टल या यंत्रणेमार्फत दि.१८.०५.२०१८ ते दि.२३.०५.२०१८ या कालावधीत पूर्व परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

तसेच, दि.१३.०४.२०१७ च्या शासन निर्णयानुसार नगररचनाकार व विकास सेवा संवर्गातील एकुण ४५५ पदे नगररचना व मुल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील संबंधित संवर्गातील अधिकाऱ्यांमधून १००% प्रतिनियुक्तीने भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील वडगाव शेरी भागात अग्निशमन केंद्र उभारण्याबाबत**

**(१७) ९९९२५ (०१-०१-२०१८). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वडगाव शेरी भागात लोकसंख्येत मोठया प्रमाणात वाढ होत असून त्याचप्रमाणे तेथे मोठया कंपन्या, आयटी कंपन्या, मॉल्स व व्यावसायिक दुकाने असल्याने तेथे अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे व महानगरपालिकेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार मागणी करुन देखील त्या मागणीची शासनाकडून व महानगरपालिकेकडून दखल न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर ठिकाणच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला असून यावर कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत व येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) पुणे शहरातील वडगाव शेरी भागात अग्निशमन केंद्र उभारणीसाठी लोकप्रतीनिधीकडून मागणी होत असून, वडगाव शेरी भागासाठी खराडी येथे अग्नीशामक केंद्रासाठीचे आरक्षित जागेवर सदर केंद्र उभारणीसाठी आवश्यक जागा उपलब्ध करण्याची प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

(३) वडगाव शेरी भागासाठी सध्या लगतच्या येरवडा, होटमिक्स प्लान्ट व हडपसर इंडस्ट्रीअल इस्टेट या ठिकाणचे अग्नीशमन वाहन उपलब्ध केले जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका शाळातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आल्याबाबत

**(१८) १००३९४ (०१-०१-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका शाळातील विद्यार्थ्यांना विनाविलंब शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (डीबीटी) योजना राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिका शाळातील हजारो विद्यार्थ्यांना स्वातंत्रदिनालाही गणवेश मिळाला नसताना विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेले शैक्षणिक साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याचा प्रकार पुढे आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या दफ्तराच्या साहित्याची प्रयोग शाळेत तपासणी केली असता दफ्तरात वापरण्यात आलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याचे सिद्ध झाले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या शाळांना निकृष्ट दर्जाच्या साहित्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उत्कृष्ट दर्जाचे वेळेत उपलब्ध होण्याकरिता शासन कोणती प्रणाली विकसित करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) काही प्रमाणात शालेय दप्तरे निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आले असून दप्तरांच्या शिलाईमध्ये त्रुटी आढळून आल्या होत्या.
(४) निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा पुरवठा केलेल्या पुरवठाधारकांना महानगरपालिकेच्या काळया यादीत टाकण्यात आलेले आहे. संबंधित पुरवठा धारकांकडून निकृष्ट दर्जाची शिलाई असलेली सर्वच्या सर्व दप्तरे नव्याने बदलून घेण्यात आलेली आहेत.
(५) महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाच्या, शासन निर्णयानुसार राज्यात सर्वप्रथम पुणे महानगरपालिकेमार्फत डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफर (डी.बी.टी.) योजना राबविणेत आलेली आहे.

पुणे महानगरपालिकेतर्फे शासन धोरणानुसार लाभार्थ्यांचे बँक खात्यामध्ये थेट रक्कम जमा करणेत आलेली आहे. सदर योजने अंतर्गत स्थानिक अग्रगण्य वर्तमान पत्रातुन जाहिर प्रकटनाव्दारे प्रसिध्दी करुन पुरवठा धारकांना आवाहन करण्यात येवून सहभागी दर्शविलेल्या पुरवठा धारकांचे पॅनेल तयार करुन लाभार्थ्यांना आवश्यक असलेले गणवेश व गणवेश साहित्य

उपलब्ध होणेकामी शासन निर्णयामध्ये नमूद केलेनुसार वितरण व्यवस्था करणेत आलेली आहे. तसेच यामध्ये पुढील वर्षी मे महिन्यात विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व इतर साहित्याची रक्कम त्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करणेत येत असून विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व इतर साहित्याची खरेदी १५ जुनच्या अगोदर करणे शक्य होईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिवशाही पुनर्वसन कंपनी पुनर्जीवित केल्यानंतर विकासकांना थेट अर्थसहाय्य देण्याची योजना असफल झाल्याबाबत

**(१९) १००३९५ (३०-१२-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील आतापर्यंत मंजूर असलेल्या ३५०० झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणांतर्गत परवानगी देण्यात आलेल्या पुनर्विकास योजनेतील अनेक योजना वर्षानुवर्षे कार्यान्वित होऊ न शकल्यामुळे मा.मुख्यमंत्री यांनी शिवशाही पुनर्वसन कंपनी पुनर्जीवित केल्यानंतर विकासकांना थेट अर्थसहाय्य देण्याची योजना असफल झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांना स्टेट बँक ऑफ इंडियाकडून अर्थसहाय्य देण्याची नवीन योजना विकासकांसाठी सुरु करण्यात आली असल्याची जाहिरात स्टेट बँक प्रशासनाने देऊन विकासकांकडून प्रस्ताव मागविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांचे काम सुरु झाले आहे वा याबाबत सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०५-२०१८) :** (१) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितचे कामकाज संस्थापनेपासून चालू असल्याने पुनर्जीवित झाली असे म्हणणे वैधानिकदृष्टया योग्य नाही. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कडून ऑक्टोबर १९९९ पर्यंत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी थेट अर्थसहाय्य देण्यात आले होते. सदर अर्थसहाय्याची संपूर्ण रक्कम तत्कालीन समायोजित व्याजासह एप्रिल २००७ पर्यंत वसूल करण्यात आलेली आहे. तद्नंतर शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून थेट अर्थसहाय्य देण्याची योजना राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर योजना असफल होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) व (३) यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मंजूर झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांतील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने आणि योजनांतील विकासकांच्या वाटयाच्या विक्री घटकात विकासकांनी ३० चौ.मी. पर्यंत आणि ३० ते ६० चौ.मी. पर्यंतच्या चटई क्षेत्रफळाच्या व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे परवडणाऱ्या घरांच्या किंमतीच्या मर्यादेत बृहन्मुंबईत विक्री करण्यास प्रवृत्त करण्यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून स्टेट बँक ऑफ इंडियाशी काही अटींसह सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सदर सामंजस्य करार मुख्यत: राष्ट्रीयकृत बँकेच्या धोरणाच्या अधिनस्त असून स्टेट बँक ऑफ इंडियाकडून विकासकांचे प्रस्ताव मागविण्याची जाहिरात देण्यात आली होती. त्यानुषंगाने एकूण ८ प्रस्ताव प्राप्त झाले असून प्राप्त प्रस्तावांची छाननी चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील दोन हजारांहून अधिक पथारी व्यावसायिकांना नोंदणी प्रमाणपत्रे देण्याबाबत**

**(२०) १००४३८ (३०-१२-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील दोन हजारांहून अधिक पथारी व्यावसायिकांची नोंदणी प्रमाणपत्रे तयार असूनही त्यावर पदनिर्देशित अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नसल्याने या प्रमाणपत्रांचे वाटप न झाल्याने पथारी व्यावसायिकांवर कारवाई केली जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुसार या पथारी व्यावसायिकांची नोंदणी प्रमाणपत्रे त्यांना तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार पुणे महानगरपालिकेकडून शहरातील पथविक्रेत्यांचे संगणकीय बायोमेट्रीक सर्वेक्षणाचे काम चालू करण्यात आले आहे.

प्रमाणपत्रांची छपाई चालू असताना पुणे महानगरपालिकेचे संबंधीत उपआयुक्त यांनी छापून तयार झालेल्या प्रमाणपत्रांवर स्वाक्षरी करुन उर्वरित बाबींची पूर्तता करुन सदरची प्रमाणपत्रे नोंदणीकृत फेरीवाल्यांना नियमानुसार वाटपाचे कामकाज करण्यात आलेले आहे.

तथापि विहित कार्यपध्दतीनुसार दैनंदिन अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत नियमीत करण्यात येत होती.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हडपसर (जि.पुणे) परिसरातील नागरिकांना दुर्गंधी व रोगराईचा त्रास होत असल्याबाबत**

**(२१) १००४६७ (०१-०१-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) मध्ये कचऱ्याचे प्रकल्प वाढत असून येथील परिसरातील नागरिकांना दुर्गंधी व रोगराईचा त्रास होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुसार हडपसर मधील कचरा प्रकल्पांमुळे परिसरात होणारी दुर्गंधी व रोगराई रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेच्या हडपसर कचरा हस्तांतरण केंद्रा शेजारी पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे कचरा साठवणूक केंद्र असून सदर कचरा केंद्रामध्ये कचऱ्यावर कुठल्याही प्रकारची प्रक्रिया न करता कचरा टाकला जातो.

सदराचा कचरा मिश्र स्वरुपाचा असल्याने तो कुजतो व त्यामुळे सदर ठिकाणी माशा, दुर्गंधी व डास इत्यादींचा त्रास आजूबाजूच्या सोसायटी व रहिवाश्यांना होतो.

सदरची बाब ही हडपसर इंडस्ट्रीयल इस्टेट मंचाने पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या विरुध्द ह्या पूर्वीचे रिट पिटीशन ९६/१९९९ व्दारे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणलेली आहे. तसेच पुणे महानगरपालिकेतर्फे ही पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डास मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करण्याबाबत कळविले आहे.

पुणे महानगरपालिकेव्दारे हडपसर परिसरामधील नागरिकांना कोणताही वास, दुर्गंधी इत्यादीचा त्रास होणार नाही ह्याची पूर्ण काळजी पुणे महानगरपालिकेव्दारे घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात पाण्यावर प्रक्रिया न करता समुद्रात व खाडीत सोडले जात असल्याबाबत

**(२२) १००९२९ (०१-०१-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने मलनि:सारण प्रकल्प, मलनि:सारण व्यवस्था चालविणे व मलनि:सारणाची विल्हेवाट करणे या तीन विभागाची महालेखापालाने (कॅग) केलेल्या पहाणीत महानगरपालिकेच्या क्षेत्रात दररोज २ हजार १४६ दशलक्ष लिटर्स एवढे सांडपणी तयार होते तर त्यापैकी १ हजार ९८ दशलक्ष लिटर्स पाण्यावर प्रक्रिया न करता समुद्रात व खाडीत सोडले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित निम्मे सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता समुद्रात व खाडीत सोडले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई क्षेत्रात प्रतिदिन करण्यात येणाऱ्या ३७५० एम.एल.डी. इतक्या पाणी पुरवठ्यापैकी गळती व वापरानंतर सुमारे २१९० एम.एल.डी. इतके सांडपाणी निर्माण होते..

सद्य:स्थितीत बृहन्मुंबई हद्दीतील अस्तित्वात असलेल्या मलनि:सारण वाहिन्यांमधून सुमारे १८८२ एम.एल.डी. इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते.

उर्वरित सांडपाण्याची विल्हेवाट खाजगी इमारती, गृहनिर्माण संस्था आस्थापना इत्यादींमधील सेफ्टीक टँक व मलजल प्रक्रिया संयंत्रद्वारे प्रक्रिया करुन लावली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंडणगड शहर व परिसरात (जि. रत्नागिरी) श्वानदंशाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याबाबत**

**(२३) १०१२०४ (०१-०१-२०१८). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड नगरपंचायत व परिसरात (जि. रत्नागिरी) श्वानदंशाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली असून पिसाळलेल्या श्वानांनी अनेक नागरिकांचा व जनावरांनाही दंश केल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचरा व्यवस्थापनासाठी नगरपंचायतीला योग्य जागा मिळत नसणे, ओल्या व सुक्या कच-याची वेगळी व्यवस्था करता न येणे, त्यामुळे मोकाट श्वानांची संख्या वाढत आहे तसेच तुळशी घाटात माहू गावाच्या हद्दीत कचरा उघड्यावर टाकला जात असल्याने श्वानांना विविध रोगांची लागण होऊन अशा घटना घडत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कचऱ्याचे व्यवस्थापन करुन रोगराई व परिसरातील दुर्गंधी दूर करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे व तद्नूसार भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१) मंडणगड नगरपंचायत परिसरात श्वानांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याने पिसाळलेल्या श्वानांनी अनेक नागरीकांना व जनावरांना चावा घेतल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे.

(२) सद्यस्थितीत मंडणगड नगरपंचायतीने तुळसीघाट व माहु गावाच्या हद्दीत कचरा टाकणे बंद केले असून कचऱ्याची विल्हेवाट बंदिस्त खड्यामध्ये नगरपंचायतीच्या जागेमध्येच करण्यात येत आहे. सदर ठिकाणी सर्व रोग प्रतिबंधक उपाययोजना नगरपंचायतीमार्फत केल्या जात आहेत.

(३) सदर ठिकाणी कचऱ्याचे व्यवस्थापन करत असताना दुर्गंधमुक्त औषधे, रोगराईस आळा घालणारी औषध फवारणी यासारख्या प्रभावी उपाययोजना नगरपरिषदेमार्फत करण्यात येतात.

तसेच भटके श्वानांना आळा घालण्यासाठी त्यांना नगरपंचायत हद्दीबाहेर सोडण्यात येते. पिसाळलेल्या श्वानांच्या बंदोबस्ताबाबत नगरपंचायतीकडून वेळोवेळी खबरदारी घेतल्या जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंतप्रधान आवास योजनेत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी बांधण्यात येत असलेल्या घरांसाठी भूखंड उपलब्ध होत नसल्याबाबत

**(२४) १०२१९२ (३०-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी ३३ हजार ५१० व इतरांसाठी सव्वा सहा हजार घरे बांधण्याचे प्रस्तावित असताना आता पुरेसे भूखंड उपलब्ध होत नसल्यामुळे सव्वा सात हजार घरे कमी बांधण्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले आहेत व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत बांधावयाच्या घरांसाठी किती निधीची आवश्यकता आहे, प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे व घरे बांधण्यासंदर्भातील सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अतंर्गत सन २०२२ पर्यंत राज्यात १९.४० लक्ष घरकुलांची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले आहे. सदर योजनेतंर्गत कैंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने २,२१,७९५ घरकुलांचा (१,४५,२४३ EWS) समावेश असलेल्या राज्यातील ९४ प्रकल्पांना मंजूरी दिलेली आहे. त्यामध्ये कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातील २३,९६४ लाभार्थींचा समावेश आहे. सदर मंजूर प्रकल्पांपैकी २८,१७९ घरांचा (१६,१९७ EWS) समावेश असलेल्या १९ प्रकल्पांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत प्रकल्पांसाठी निविदा मागविणे, निविदा मंजूर करणे इ. कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) कैंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने मंजूर केलेल्या ९४ प्रकल्पांकरिता अंदाजे रु.३१,९४०.८२ कोटी एवढी प्रकल्प किंमत आहे. मंजूर ९४ प्रकल्पांमधील १,४५,२४३ EWS घरकुलांसाठी केंद्र शासनाकडून रु.२१,६६.८६५ कोटी व राज्य शासनाचे रु.१४,५२.४३ कोटी इतके अनुदान आवश्यक आहे. सदर अनुदान ३ टप्प्यात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) साठी केंद्र हिश्श्यापोटी रु.३७१.५८ कोटी इतका निधी राज्य शासनास उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधीपैकी अमरावती महानगरपालिका (रु.३६.९४८ कोटी), अकोला महानगरपालिका (रु.७.४४६ कोटी) व कोकण मंडळ, म्हाडा (रु.१६४.९७६ कोटी) इतका निधी सुकाणू अभिकरण, म्हाडास उपलब्ध करुन दिलेला आहे.

---

**राज्यातील सर्व नगरपरिषदांत रोजंदारी कर्मचाऱ्यांसह अनेक कंत्राटी आणि अभिकर्त्यामार्फत कार्यरत हंगामी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(२५) १०२२९२ (०१-०१-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य नगरपालिका, नगरपंचायत, मुख्याधिकारी, कर्मचारी, रोजंदार कामगार, संवर्ग कर्मचारी कामगार संघटना, संघर्ष समिती, महाराष्ट्र नगरपरिषद रोजंदार कर्मचारी कृती समिती यांच्या समवेत रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करावे व नगरपरिषद कामगारांच्या इतर मागण्यांसंदर्भात माननीय मुख्यमंत्री यांच्या समवेत दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दिनांक ११ मार्च, १९९३ ते दिनांक २७ मार्च, २००० पर्यंतच्या नगरपरिषदेतील रोजंदारी कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याकरिता राज्यातील सर्व नगरपरिषदांकडून सदर कालावधीत कार्यरत असलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांची माहिती शासनाने माहे सप्टेंबर, २०१७ च्या अंतिम आठवड्यात संकलित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व नगरपरिषदांमध्ये रोजंदारी कर्मचाऱ्यांसह अनेक कंत्राटी आणि अभिकर्त्यामार्फत कार्यरत हंगामी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाकडून कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील नगरपरिषदांमध्ये दि.११.०३.१९९३ ते दि.२७.०३.२००० या कालावधीतील रोजंदारी कामगारांना सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव दि.२८.०२.२०१८ रोजी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून सादर करण्यात आला. तद्नंतर, आवश्यक पुरक माहिती संचालनालयाने मे, २०१८ मध्ये शासनास सादर केली आहे. उपरोक्त कालावधीतील रोजंदारी कर्मचाऱ्यांबाबतच्या धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव नियमानुसार तपासण्यात येत आहे.

मात्र, राज्यातील सर्व नगरपरिषदांमध्ये कंत्राटी आणि अभिकर्त्यामार्फत कार्यरत हंगामी कर्मचाऱ्याला शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाचे धोरण नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील अनधिकृत होर्डिंग जाहिरात फलक, फ्लेक्स, बॅनरवर कारवाई करण्याबाबत

**(२६) १०२६४९ (०३-०१-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील अनधिकृत होर्डिंग जाहिरात फलक, फ्लेक्स, बॅनरवर कारवाई करण्यात अपयश आल्यामुळे उच्च न्यालयाने न्यायालयाचा अवमान केल्याची नोटीस पुणे महानगरपालिकेला बजावली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील बसथांबे, सार्वजनिक ठिकाणे, स्वच्छता गृहे, झाडे, विविध इमारती इत्यादी ठिकाणी अनधिकृत जाहिरातीचे होर्डींग लावण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदी, कॅनॉल, हरित पट्टा या ठिकाणी महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा जलसंपदा यांच्या मालकीच्या जागेवर अनधिकृत होर्डिंग लावण्यात आले असून या जागेवर कोर्टाचे जैसे थे आदेश असताना देखील अनधिकृत होर्डींगसाठी परवानगी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनधिकृत होर्डींग संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१), (२) व (३) • उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.१५५/२०११ मध्ये दि.३१/१/२०१७ रोजीच्या आदेशानुसार पुणे शहरातील अनधिकृत होर्डिंग जाहिरात फलक, फ्लेक्स, बॅनर यांच्यावर प्रभावीपणे कारवाई करण्यात येते.

• पुणे शहरातील बसथांब्यावरील जाहिरातींच्या करीता शुल्क घेणेसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ यांचेकडून प्राप्त तपशिलानुसार संबंधीत जाहिरातदारांकडून शुल्क स्विकारण्यात येते. तथापि सार्वजनिक ठिकाणे जसे की स्वच्छतागृहे, झाडे, विविध इमारती इ. ठिकाणी अनधिकृत जाहिरात होर्डिंग लावल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर संबंधीत क्षेत्रिय कार्यालयामार्फत कारवाई करण्यात येते.

• पुणे मुठा नदीपात्रातील परवानगी दिलेल्या जाहिरात फलकांच्या निष्कासनाबाबत नदीपात्रातील २६ पैकी २४ जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई जुलै २०१७ मध्ये करण्यात आलेली आहे. तथापी कोर्टाचे जैसे थे आदेश असलेल्या दोन जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करण्याबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना शासन स्तरावरुन वेळोवेळी सूचना देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार उपविभागाच्या सर्वांगिण विकास करण्याबाबत**

**(२७) १०२८१४ (०१-०१-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार परिसरातील वाढते औद्योगिकीकरण व नागरीकरण लक्षात घेता या विभागासाठी सर्व समावेशक असा पायाभूत सुविधांचा बृहत आराखडा (comprehensive infrastructure master plan) तयार करण्यात यावा व वसई-विरार उपविभागाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी (JICA) कडून दिर्घमुदतीचे कर्ज महानगरपालिकेस मिळण्याबाबतच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झालेला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाच्या झालेल्या निर्णयाबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) व (२) सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदरचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गॅलेक्सी रेसीडेन्सी (ता.वसई, जि.पालघर) यांनी जीआर अधिक सहा असे वाणिज्य बांधकाम करुन हॉटेल व्यवसाय सुरु केल्याबाबत**

**(२८) १०२८८० (०३-०१-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गॅलेक्सी रेसीडेन्सी (ता.वसई, जि.पालघर) हॉटेल व लॉज, वसंतनगरी, लिंकरोड वसई (पूर्व) यांना बांधकाम आराखडयामध्ये ६ मजल्याची इमारत बांधण्याची परवानगी दिली असताना त्यांनी जीआर अधिक सहा असे वाणिज्य बांधकाम करुन हॉटेल व्यवसाय सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभारी सहायक आयुक्त प्रभागड यांच्याकडून एम.आर.टी. ॲक्ट सन १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यास प्रभारी सहाय्यक आयुक्त ड हे दुर्लक्ष करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणात दोषी आढळलेल्या व्यक्तिंवर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१८) :** (१) सदर इमारतीला ST+G+६ मजले अशी रहिवाशी इमारत म्हणुन बांधकाम परवानगी दिली आहे.

परंतु, जागेवर G+६ अशी इमारत आहे व वाणिज्य वापर चालु असून हॉटेल व्यवसाय केला जात आहे.

अनधिकृत बांधकामास प्रभाग कार्यालयामार्फत नोटीस देण्यात आलेली आहे.

(२) उपरोक्त प्रमाणे विकासकांनी वरील तपशिलाचे नमुद ठिकाणी अनधिकृत बांधकाम करून जागेचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकरणी विकासक व भोगवटा धारकांविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत पोलीस ठाणे, तुळींज यांना गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक ०८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर आणि परिसरातील जैववैविध्य उद्यानासाठी आरक्षित (BDP) असलेल्या टेकड्यांवर अतिक्रमणे वाढत असतानाच टेकडीफोड होत असल्यबाबत

**(२९) १०४९३२ (१२-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, कोथरूड येथील चांदणीचौका जवळ बांधकाम व्यावसायिकाकडून बेकायदेशीर टेकडीफोड केल्याचा प्रकार दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारासन निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पौड रोड वरील चांदणीचौकाजवळ अथश्री सोसायटीसमोर बीडीपी क्षेत्र तसेच बावधन परिसरातील सर्वे क्र. ६० येथे व वडगाव धायरी, कोंढवा, बावधन, कात्रज, आंबेगाव पठार परिसरात मोठ्या प्रमाणात टेकडीफोड करण्याचे काम राजरोसपणे सुरु असून त्याकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहर आणि परिसरातील जैववैविध्य उद्यानासाठी आरक्षित (BDP) असलेल्या टेकड्यांवर अतिक्रमणे वाढत असतानाच टेकडीफोड सुद्धा जोरात सुरु असल्याचे माहे जानेवारी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी संबंधित बांधकाम व्यावसायिकांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) अथश्री सोसायटी, बावधन खुर्द समोरील टेकडीवर श्री.काळे यांचेमार्फत स.नं. ६० येथे सुरु असलेल्या कामास महाराष्ट्र रिजनल अँड टाउन प्लॅनिंग अक्ट १९६६ मधील तरतूदीनुसार दि. १२/०१/२०१८ रोजी पुणे महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात येऊन जागेवरील टेकडीफोडचे काम थांबविण्यात आलेले आहे.

तसेच हिंगणे खुर्द स.नं. ३,४,५,६ पार्ट सुरु असलेले खोदकामाबाबत संबधित विभागाचे तहसीलदार, हवेली यांना दि.०८/०२/२०१८ च्या पत्रान्वये पुढील कारवाईसाठी कळविण्यात आले आहे.

(४) पुणे महानगरपालिकेने बावधन खुर्द येथील सुरु असलेल्या उत्खननाबाबत बांधकाम विकास विभाग झोन क्र. ३ जा क्र. ३/४६४८ दि. १२/०१/२०१६ अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हिंजवडी पोलीस स्टेशन यांना एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ च्या तरतुदीनुसार गुन्हा दाखल करणेबाबत कळविले आहे. तद्नंतर संबंधिताने टेकडीफोड करण्याचे काम थांबविले आहे.

बांधकाम विकास विभाग झोन क्र. २ हिंगणे खुर्द येथील उत्खननाचे काम थांबविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वारजे, कोथरूड, बावधन, भुसारी कॉलनी, बालाजीनगर, बिबेवाडी (ता.हवेली, जि.पुणे) या भागातील ओढे-नाल्यांवर अतिक्रमणे झाल्याबाबत

**(३०) १०५०९६ (०३-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारजे, कोथरूड, बावधन, भुसारी कॉलनी, बालाजीनगर, बिबेवाडी (ता.हवेली, जि.पुणे) या भागातील ओढे-नाल्यांवर अतिक्रमणे झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भागातील बहुतांश ठिकाणी नैसर्गिक ओढे-नाले वळविण्यात आले असून त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असतांना महानगरपालिका प्रशासनाकडून कुठलीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब अतिशय गंभीर असून याबाबत महानगरपालिका प्रशासनास वेळोवेळी पत्रव्यवहार व बैठका घेऊन कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असता कोणतीही कारवाई होत नसल्याने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

वारजे स.क्र. ०९ येथील नाल्यामध्ये अतिक्रमण करुन भिंतीचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले होते. सदर बांधकामास पुणे महानगरपालिकेतर्फे नोटीस देवून ते बांधकाम माहे जानेवारी व फेब्रुवारी २०१८ मध्ये पाडण्यात आलेले आहे.

(२) व (३) प्रायमूव्ह कन्सलटंट नुसार प्रस्तावित करण्यात आलेल्या नाल्यांच्या आखणीमध्ये बदल करण्यात आलेले आहेत. तत्कालीन विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार काही ठिकाणी आखणीमध्ये बदल करण्यात आलेले आहे. प्रायमुव्ह कन्सलटंट अहवालानुसार पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी नाल्याची आखणी लांबी रुंदी व उंची निश्चित करुन ठरविण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिका प्रशासनामार्फत नाल्यावर अतिक्रमण आढळल्यास त्यावर वेळोवेळी नोटीस देवून कारवाई करण्यात येत असते. त्याचप्रमाणे नाल्याची आखणी, लांबी, रुंदी, उंची पुणे महानगरपालिकेमार्फत प्रायमूव्ह कन्सलटंट यांची नेमणूक करुन त्यांच्या अहवालानुसार निश्चित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहीद जवानांच्या कुटुंबियांची कायमस्वरूपी देखभालीची योजना आखण्याबाबत**

**(३१) १०५५३७ (०३-०४-२०१८). श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातून देशाच्या संरक्षणासाठी लष्करात भरती होणाऱ्या जवानांपैकी मागील ३ वर्षात अनेक जवानांना वीरमरण प्राप्त झाल्यानंतर शासनाने त्या जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची घोषणा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील किती शहीद जवानांच्या कुटुंबियांना शासनाने मदत दिली आहे,

(३) असल्यास, राज्यातील तरुणांनी मोठ्या प्रमाणात लष्करात भरती व्हावे यासाठी शासन त्यांच्या कुटुंबियांसाठी कायमस्वरूपी देखभालीची योजना आखणार आहे काय,

(४) असल्यास, जवान सीमेवर कार्यरत असताना तसेच निवृत्त झाल्यानंतरही राज्यातील पोलीस व प्रशासनाकडून त्या जवानांचा आदर राखला जावा यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२१-०५-२०१८) :** (१) होय, खरे आहे.

१) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.मासैम १०९९/१६६१/प्र.क्र. १२६/९९/२८ दिनांक ४/१०/२००० अन्वये (दिनांक १/५/१९९९ ते ३१/३/२०१६ पर्यंत ५ लक्ष प्रत्येकी)

२) शासननिर्णय, सा.प्र.वि.क्र.मासैम-२०१६/प्र.क्र.९२(१)/२०१६/२८,दि.३०/११/२०१६ अन्वये (दिनांक १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ - रु. ८ लक्ष प्रत्येकी)

(दिनांक १/४/२०१७ ते ३१/१२/२०१७ - रु. ८.५० लक्ष प्रत्येकी)

३) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.मासैम-२०१७/(प्र.क्र.३१०) २०१७/२८, दिनांक २७/३/२०१८ अन्वये १/१/२०१८ पासून प्रत्येकी रु. २५ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात येत आहे.

(२) मागील ३ आर्थिक वर्षामध्ये शहीद झालेल्या ४९ जवानांच्या कुटुंबियांना एकूण रुपये ३.४४ कोटी इतकी शासनाची आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(३) शहीद जवानांच्या कुटुंबियांची कायमस्वरुपी देखभाल करण्यासाठी खालील प्रमाणे केंद्र व राज्य शासनाच्या योजना आहेत.

१) केंद्र शासनाकडून शहीदांच्या विधवा पत्नीस सैनिकाच्या मृत्यूच्या वेळच्या वेतना इतकी तहहयात लिब्रलाईज्ड फॅमिली पेन्शन मंजूर करण्याची तरतूद आहे.

२) शा.नि. क्र. आरटीए-१०८२-३५०२-सीआर १००-१६ अ, दि. ०२/०९/१९८३ अन्वये युध्दात किंवा सैन्य दलातील सेवेत असतांना मृत्यू पावलेल्या सैनिकांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस वर्ग-३ व वर्ग- ४ मधील १५% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवर नियुक्त देण्याची तरतूद आहे.

३) शा.नि.क्र.मासैम-१०९९/१६६१/प्र.क्र.१२६/९९/२८,दिनांक ४/१०/२००० मधील तरतूदीनुसार शहीद जवानांच्या कुटुंबियांना शासनाकडून मिळालेल्या आर्थिक मदतीपैकी ८०% रक्कम मुदत ठेवीत गुंतवून त्यांचेकरिता कायमस्वरुपी आर्थिक मदत उत्पन्नाचे स्तोत्र निर्माण केले जाते.

४) शासन निर्णय क्रमांक एचडीएफ १०७९/२२२९२०(५३७) साशि- ५ दि. १४/०१/१९८५ अन्वये शासनमान्य अनुदानित अध्यापक विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तसेच शासनमान्य व अनुदानित शिक्षण संस्थेतून शिवणकला व बेतणे यासारखे पाठयक्रम शिकत असलेल्या माजी सैनिकांच्या पत्नींना/विधवांना दरमहा विद्यावेतन देण्याची तरतूद आहे.

५) कल्याणकारी निधी सुधारित नियम २००१ (सुधारित आवृती २०१६) मधील तरतूदीनुसार माजी सैनिक विधवा यांना रोजगार/स्वंयरोजगार प्रशिक्षण घेणेकरिता तसेच त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाकरिता आर्थिक मदत देण्याची तरतूद असून त्यांचेद्वारे स्वंयरोजगार सुरु केल्यास रुपये ३ लाखा पर्यंत आर्थिक मदत देण्याची तरतूद आहे.

६) कल्याणकारी निधी सुधारित नियम २००१ (सुधारित आवृती २०१६) मधील तरतूदीनुसार माजी सैनिक पत्नी/विधवा यांचेद्वारे बचत गट तयार करतांना त्यामध्ये किमान तीन विधवांना सहभागी करुन घेण्याचे बंधन असून सदर बचत गटाच्या व्यवसायाकरिता रु.१० लाखा पर्यंत आर्थिक मदत देण्याची तरतूद आहे.

(४) जवान सीमेवर कार्यरत असतांना तसेच निवृत्त झाल्यावर राज्यातील पोलिस व प्रशासनाकडून जवानांचा आदर राखण्यासाठी खाली नमूद शासन निर्णय/परिपत्रकाद्वारे त्यांचेसमोर नमूद उपाय योजना करण्यात येत आहेत.

१) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०९९/३१३६/प्र.क्र. २७२/९९/२८ दि. २६/११/१९९९-माजी सैनिकांना सैजन्याची वागणूक देण्याबाबत

२) शासन निर्णय क्रमांक मासैम १०००/७८६/ प्र.क्र. ९५(२०००)/२८, दिनांक २८/०९/२०००-आजी/माजी सैनिकांच्या मागण्या/अडीअडचणी सोडविण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर तीन महिन्याला एक दरबार भरविणे.

३) शासन निर्णय क्रमांक सैकवि १०९९/२८८/ प्र.क्र. ४०(९९)/२८, दिनांक १६/०१/२००१ - राज्यातील आजी/माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तालुका पातळीवर मा.तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली दर सहा महिन्यांनी तालुका स्तरावर बैठक.

४) शासन निर्णय क्रमांक मासैक २००२/ प्र.क्र. १२५/२००२/२८ दिनांक २९/११/२००२ - राज्यातील माजी सैनिकांना बंदुकीचा परवाना, स्वस्तधान्य दुकान, सिलीगमधील शेतजमीनीचे वाटप, निवासी भूखंड वाटप इत्यादी सुविधा/सवलती मिळवून देण्यासाठी मा.अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक महिन्याला बैठक.

५) शासन निर्णय क्रमांक एमआयएस १००६/ प्र.क्र.३०९ /वि.शा. ४ दिनांक ०४/१०/२००७- आजी/माजी सैनिकांच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यासाठी जिल्हयातील जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा बैठक.

६) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१७/ प्र.क्र. १५०/३०, दिनांक १२/१०/२०१७ - प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन या राष्ट्रीय ध्वजारोहन कार्यक्रमास शहीद जवानांच्या पत्नीना व आई- वडील यांना सन्मानपूर्वक निमंत्रण.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात पासिंगविनाच ॲम्ब्युलन्स रस्त्यावर धावत असल्याबाबत**

**(३२) १०५८२१ (१८-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील अग्निशामक दलाची ॲम्ब्युलन्स पासिंगविनाच धावत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशामक दलाची ॲम्ब्युलन्सच्या पासिंगची माहिती आरटीओच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरटीओजवळ रुग्णवाहिका व शववाहिकेची वेगवेगळी नोंदणी करणे आवश्यक असतानाही रुग्णवाहिकेमध्येच मोठ्या प्रमाणात शव वाहून नेण्याचे प्रकार अग्निशामक दलाच्या ॲम्ब्युलन्समध्ये सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने संबधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे सध्या कार्यरत असलेल्या ६ ॲम्ब्युलन्सपैकी वाहन क्र. MH १२ RR ०७०५ या ॲम्ब्युलन्सचे पासिंग वैधता दि. २७/०८/२०१७ रोजी पर्यंत होती. सदरचे वाहन माहे ऑगस्ट २०१७ मध्ये आर.टी.ओ. मार्फत तपासून घेऊन फिटनेस सर्टिफिकेट प्राप्त करणे अपेक्षित होते.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वाहन तपासणीसाठी २५० मिटर लांबीच्या ब्रेकटेस्टिंग ट्रॅक असणे बंधनकारक केल्यामुळे व प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे वाहन तपासणीसाठी २५० मिटर लांबीच्या ब्रेकटेस्टिंग ट्रॅक उपलब्ध नसल्याने सदर वाहन क्र.MH-१२-RR-०७०५ या ॲम्ब्युलन्सचे पासिंग करता आले नाही.

तद्नंतर दि.२९/१२/२०१७ रोजी झेंडेवाडी ता.पुरंदर येथे वाहन तपासणीसाठी २५० मिटर लांबिच्या ब्रेकटेस्टिंग ट्रेक प्रादेशिक परिवहन कार्यालयाने उपलब्ध करुन दिल्यानंतर उपलब्ध शेड्युलनुसार दि.२४/०२/२०१८ रोजी सदर वाहन क्र.MH-१२-RR-०७०५ या रुग्णवाहिकेचे पासिंग करण्यात आले आहे.

(४) अंशतः खरे आहे.

नागरिकांच्या मागणीनुसार अशा सुविधा पुरवाव्या लागतात, ही वस्तुस्थिती आहे. तथापी फेब्रुवारी २०१८ मध्ये नव्याने ३ शववाहिका दाखल झाल्या असून त्याचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील वाहन नोंदणी प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील स्पीड ब्रेकर बसविताना निकष पाळले जात नसल्याबाबत**

**(३३) १०५८९३ (१९-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील स्पीड ब्रेकर बसवताना निकष पाळले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्पीड ब्रेकर कसे असावेत याबाबतचे निकष असून इंडियन रोड कॉंग्रेसची (आयआरसी) नियमावली आहे त्यानुसार मुख्य रहदारीच्या रोडवर स्पीड ब्रेकर बसविण्यास येत नाही असा नियम असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात अंतर्गत रस्त्यासह मुख्य रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात स्पीड ब्रेकर बसविण्यात आले असून या वर्षात आतापर्यंत वाहतूक पोलिसांनी ११६ ठिकाणी रबरी स्पीड ब्रेकर बसविण्यास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू बाबींमुळे वाहतुकीला अडथळा, वाहनचालकांना त्रास व अपघाताचा धोखा असताना प्रशासनाकडून यासंदर्भात कोणती दखल घेण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१), (२) व (३) पुणे महानगरपालिकेमार्फत नागरिक, लोकप्रतिनिधींचे मागणीनुसार जागेवरील वाहतुक व रहदारीच्या परिस्थितीनुसार पुणे महानगरपालिकांच्या विविध विभागांचे मागणीनुसार, तसेच इंडियन रोड कॉंग्रेसची (आयआरसी) नियमावली गतिरोधक नुसार करणेत येतात.

इंडियन रोड कॉंग्रेसच्या (आयआरसी) नियमावली मधील मार्गदर्शक तत्वानुसार शहरी भागातील वाहतुक नियंत्रणासाठी तीन प्रकारचे गतिरोधक उभारणी करणेबाबत नमूद आहेत. १) गतीरोधक २) रम्बलस्ट्रिप्स ३) रस्ता रुंदी निर्बंधित करणे.

त्यास अनुसरुन जागेवरील रहदारीच्या परिस्थितीनुसार गतिरोधक उभारणीचे कामे पुणे महानगरपालिकेमार्फत करणेत येतात.

पुणे महानगरपालिकेचे क्षेत्रिय कार्यालय, वाहतूक नियोजन विभाग व पथ विभागामार्फत पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी गतिरोधक बनविण्यात येतात. सदरचे गतिरोधक वाहतूक पोलीस विभागाची परवानगी घेऊन करण्यात येतात.

(४) गतीरोधक उभारणीमुळे वाहतुकीला अडथळा, वाहनचालकांना त्रास व अपघाताचा धोका होत नसून तसेच पुणे शहरातील वाहतुकीवर नियंत्रण ठेवणेसाठी संभाव्य अपघात टाळणे गतिरोधक उभारणीमुळे शक्य होत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथे महाळुंगे ते मनपा बससेवा बंद करण्यात आल्यामुळे प्रवाशी, विदयार्थी व कामगार यांचे हाल होत असल्याबाबत

**(३४) १०८८१९ (१८-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे महाळुंगे ते महानगरपालिका बससेवा बंद करण्यात आल्यामुळे प्रवाशी, विदयार्थी व कामगार यांची गैरसोय होत असून त्यांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी व असंतोष पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाळुंगे ते मनपा बस सेवा त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) पी.एम.पी.एम.एल. महामंडळामार्फत मार्ग क्र.१२० महानगरपालिका ते म्हाळुंगे असा बसमार्ग संचलनात होता. परंतू या मार्गावर म्हाळुंगे ते भोसरी या अंतरामध्ये प्रवासी भारमान अत्यंत कमी असल्यामुळे, तसेच सदर मार्गावरील शेड्युलच्या खेपा पूर्ण होत नसल्याने दिनांक ०८/११/२०१७ रोजी सदर मार्ग खंडीत करुन प्रवाशांच्या सोईसाठी महानगरपालिका ते चाकण आंबेठाण चौक बससेवा चालू ठेवण्यात आली आहे, हे खरे आहे.

त्याच प्रमाणे म्हाळूंगे परिसारातील प्रवाशी विद्यार्थी नागरिक यांची गैरसोय होऊ नये या करीता भोसरी ते म्हाळुंगे एम.आय.डी.सी. असा शटल बस मार्ग संचलनात ठेवण्यात आलेला आहे.

तसेच भोसरी येथुन पुणे व पिंपरी चिंचवड शहरात जाणे-येणेसाठी महामंडळामार्फत विविध मार्गाच्या बसेस ३ ते ५ मि. वारंवारीतेने सद्या संचलनात असून त्याचा प्रवाशी लाभ घेत आहेत.

तसेच म्हाळुंगे परिसरातील औद्योगिक परिसरातील कामगार प्रवाशांच्या सोईसाठी मार्ग क्र.३४३ वडगांव मावळ ते आंबेठाण चौक हा बस मार्ग १५ मि. वारंवारीतेने नव्याने सुरु करण्यात आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे म्हाळुंगे गाव एम.आय.डी.सी. परिसरातून सद्या संचलनात असलेल्या बससेवेचा कार्यभार विद्यार्थी कामगार व परिसरातील नागरीक घेत आहेत.

तसेच म्हाळुंगेगांव परिसरातील वाढते नागरीकरण पाहता महामंडळाच्या बस ताफ्यामध्ये नव्याने बसेस दाखल झालेनंतर म्हाळुंगेगांव ते निगडी असा नविन बस मार्ग सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले असून नविन बसेस उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

___

## नाशिक महानगरातील बहुतांश मिठाई दुकानदारांनी अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याबाबत

**(३५) १०९५१२ (१९-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरातील बहुतांश मिठाई दुकानदारांनी अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करीत नियमांचे उल्लंघन केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा बहुतांश मिठाईविक्रेत्यांकडून केवळ शॉप ॲक्ट व अन्न परवाना काढून व्यवसाय सुरु करण्यात आलेले आहेत मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने या दुकानदारांनी कोणतीही उपाययोजना राबविलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी शहरात दोन मीठाई विक्रेत्या दुकानांमध्ये गॅसगळती होवून स्फोट झाल्याचा प्रकार असतांना अद्याप अशा दुकांनानी अग्निप्रतिबंधक यंत्रणा अथवा सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना सुरु केलेल्या नाही अथवा प्रशासनाकडून फायर ऑडिट झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासन संपूर्ण चौकशी करुन दोषी दुकानदारांवर कारवाई करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

बहुतांश मिठाई दुकानदारांनी फक्त शॉप ॲक्ट आणि अन्न व औषध प्रशासन यांचा परवाना घेऊन व्यवसाय सुरु केले असून, महानगरपालिकेचा परवाना घेतलेला नाही.

तसेच, शहरातील मिठाईची दुकाने मिश्र वापराच्या इमारतीमध्ये तळमजल्यावर असून, बहुतांश दुकानांमध्ये आग विझविण्याचे नळकांडे ठेवलेली आहेत.

(३) महानगरपालिकेमार्फत शहरातील मिठाईच्या दुकानांची तपासणी मोहिम राबविण्यात आलेली असून, त्यांना आगप्रतिबंधक उपाययोजना म्हणून आग विझविण्याचे नळकांडे नसल्यास वा पुर्नभरण केलेले नसल्यास तशा पुर्तता करणेबाबत महानगरपालिकेमार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) गॅसगळती होऊन स्फोट झाल्याचा प्रकार झालेल्या दोन्ही दुकानदारांवर पोलीस प्रशासनामार्फत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यापैकी एका दुकानदाराने सदर ठिकाणचा व्यवसाय बंद केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे महानगरपालिकेमार्फत IHSDP योजनेंतर्गत म्हाळदे, सायने या भागात घरकुले बांधण्यात आली असून तेथे प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(३६) १०९७१५ (१२-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे महानगरपालिकेमार्फत IHSDP योजनेंतर्गत म्हाळदे, सायने या भागात घरकुले बांधण्यात आली असून या दोन्ही ठिकाणी प्राथमिक सोयी सुविधा, दळणवळण व इतरही अनेक सुविधा उपलब्ध नसणे तसेच या घरकुलांच्या बाजूलाच मालेगांव महानगरपालिकेचे डंपिग ग्राउंड असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

आयएचएसडीपी योजनेंतर्गत घरकुल योजनेच्या ठिकाणी मंजूर प्रकल्प अहवालानुसार रस्ते, पाणीपुरवठा, मलनि:स्सारण व्यवस्था, मलशुध्दीकरण केंद्र, विद्युत व्यवस्था, कम्युनिटी सेंटर इत्यादी कामे फेज १,२ व ३ साठी पुर्ण असून, किऑक्स, इन्फार्मल मार्केट ही कामे सुरु करण्यात आलेली आहेत. तसेच शाळा इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

महानगरपालिका क्षेत्रात डम्पींग ग्राऊंडसाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने, म्हाळदे येथील डम्पींग ग्राऊंड स्थलांतरीत करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सन २००७ पासून महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा सुरु आहे.

येथील घरकुल योजनेत लाभार्थी स्थलांतरीत झालेले नसल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) अस्तित्वातील म्हाळदे येथील डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्याचे बायोमायनिंग पध्दतीने विलगीकरण व प्रक्रिया यंत्र महानगरपालिकेमार्फत बसविण्यात आलेले आहे. त्यामधुन खत निर्मिती करण्यात येत असून, कचऱ्याची योग्यरित्या विल्हेवाट लावण्यात येत आहे. तसेच डम्पींग ग्राऊंडसाठी आवश्यक पोहच रस्ता, संरक्षण भिंत व निचऱ्यासाठी गटारी इत्यादी बांधकामे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिकेने संपादित केलेल्या जमिनीची किंमत वेळेवर अदा केली नसल्याबाबत**

**(३७) १०९७१७ (१२-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिका यांनी वेळोवेळी खाजगी जमिन मालकाकडून जमिन संपादित केले होती परंतू त्या जमिनीची किंमत वेळेवर अदा केली नसल्याने खाजगी जागा मालकांनी कोट्यवधी रुपयांची मागणी करुन मालेगांव महानगरपालिका विरुध्द न्यायालयात दावा दाखल केला असून सदर दाव्यांचे निर्णय महानगरपालिकाविरुध्द लागला असून यामुळे महानगरपालिकेवर वारंवार जप्तीची कारवाई होत असल्याने महानगरपालिका पदाधिकाऱ्यांची प्रतिमा मलीन होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही जमिन मालकांनी जमिन मुल्यांवर व्याजाची रककम मिळणे कामी दावे दाखल केले असून सदरहू निर्णय महानगरपालिकेच्या विरुध्द लागल्यामुळे महानगरपालिकेसे कोट्यवधी रुपये न्यायालयात भरणा करावे लागले परंतू याबाबत शासनाची मंजुरी घेण्यात आली होती का तसेच महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षक, अंतर्गत लेखा परिक्षक, लेखाधिकारी यांचे वरिल प्रकरणी स्वयंम स्पष्ट अभिप्राय घेण्यात आला होता काय याबाबत अदयापही कोणताही खुलासा संबंधित करीत नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील तत्कालीन नगरपालिकेने संपादित केलेल्या जमिनींची किंमत जमीन मालकांना वेळोवेळी अदा केलेली आहे.

तथापि, संबंधित जमीन मालकांनी भू-संपादन कायद्यानुसार वाढीव मोबदला मिळण्याबाबत मा.न्यायालयात दावे दाखल केले आहेत. त्यापैकी मुख्य ५ प्रकरणे मा.न्यायालयात प्रलंबित असून, त्यापैकी दोन प्रकरणात मा.न्यायालयाच्या आदेशानुसार जप्ती वॉरंट बजावल्यामुळे, जप्तीची कार्यवाही थांबविण्याकरीता रु.७५ लक्ष व रु.२० लक्ष रक्कम महानगरपालिकेमार्फत मा.न्यायालयात जमा करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर भूसंपादनाच्या प्रकरणांचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी महानगरपालिकेने महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

या प्रकरणांत मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संबंधित जमीन मालकांना अदा करावयाच्या वाढीव मोबदल्याच्या रकमेबाबत समितीने जमिन मालकांसोबत वाटाघाटी करुन, निश्चित करण्यात आलेली रक्कम टप्प्या-टप्प्याने देण्याचे महानगरपालिकेमार्फत ठरविण्यात आले आहे.

(२) महानगरपालिकेने जमीन संपादनासंदर्भात भू-संपादन कायद्यानुसार कार्यवाही केली असून, जमीन मालकांशी वाटाघाटी करुन, वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन, भू-संपादन प्रक्रिया पुर्ण केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

### मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यात दोन दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(३८) १०९७२७ (१४-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरामध्ये दोन दिवसाआड पाणीपुरवठा विभागामार्फत होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांना किमान एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी देऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मालेगाव शहरास नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

मालेगाव महानगरपालिकेमार्फत विभागनिहाय एक दिवसाआड पध्दतीने ३५ मिनिटे इतका पाणीपुरवठा केला जात असून, पाणी वाटपाचे प्रमाण ९० लिटर्स दरडोई असे आहे.

(३) केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत ३० एमएलडी जलशुध्दीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर असून, शहरात १६ उंच नवीन जलकुंभाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच अतिरिक्त पाणीसाठ्याची गरज लक्षात घेऊन वार्षिक अतिरिक्त ८०० द.ल.घ.फू. व अस्तित्वातील योजनेसाठी ३०० द.ल.घ.फू. असे एकूण ११०० द.ल.घ.फू. पाण्याचे आरक्षण मंजूर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगांव (ता.जि.नाशिक) मधील महेवीनगर, फिरदौसगंज, नोमानी नगर, गुलश्नाबाद,श्फीयाबाद येथे दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(३९) १०९७३२ (१८-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील अली अकबर टाकी वरील पंप कमी असल्यामुळे पंप लवकर भरत नाही तसेच एखादे वेळी मोटार खराब झाली तर पाणी सप्लाय ४/५ तास उशिराने तसेच कमी दाबाने होत असून तसेच घाण पाणी मिळत असल्याची तक्रार नागरिक वारंवार संबंधित अभियंत्यास देत असूनही या महत्वाच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महेवीनगर, फिरदौसगंज, नोमानी नगर, गुलश्नाबाद,श्फीयाबाद येथील नागरिक वारंवार तक्रारी करुन त्रस्त झाले असल्याने शासनाने याबाबत चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करणार वा करित आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१८) :** (१) व (२) मालेगाव महानगरपालिकेमार्फत अली अकबर दवाखाना येथे स्थित आझादनगर जलकुंभाव्दारे गुलशनाबाद, महेवी नगर, फिरदौसगंज, नुमानी नगर, गुलशनाबाद, शफीयाबाद इत्यादी भागात पाणीपुरवठा केला जातो.

सदर जलकुंभ भरण्यासाठी पंपींग करीता १०० हॉर्सपॉवर क्षमतेचे दोन मोटर पंप कार्यान्वीत असून, ते जलकुंभ भरण्याच्या कामासाठी पुरेसे आहेत.

माहे जानेवारी, २०१८ मध्ये पाच दिवस तांत्रिक कारणास्तव आझादनगर जलकुंभची पंपींग विस्कळीत झाली होती. त्यावर लगेच दुरुस्तीचे काम करुन पंपींग चालू करुन जलकुंभ भरण्याचे काम करण्यात आले व जलकुंभात पाण्याची पुरेशी पातळी उपलब्ध होताच या जलकुंभाव्दारे पुरेशा दाबाने सुरळीत पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

माहे जानेवारी, २०१८ मध्ये आझादनगर जलकुंभाच्या भागात घाण पाणी पुरवठा होत असल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार, वितरण व्यवस्था दुरुस्तीचे काम महानगरपालिकेचे लिकेज दुरुस्तीचे वार्षिक मक्तेदाराकडून करुन घेऊन, दुषित पाणी पुरवठ्याची तक्रार दुर करण्यात आली आहे.

तसेच, महानगरपालिकेमार्फत नियुक्ती करण्यात आलेल्या मक्तेदाराकडून पाणी वितरण व्यवस्थेचे देखभाल दुरुस्तीचे काम वेळोवेळी व नियमितपणे करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव शहरातील बहुसंख्य शासकीय इमारती, सिनेमागृह, रुग्णालय, पोलीस ठाणे या इमारतींचा मागील अनेक वर्षापासून फायर ऑडीतच झाले नसल्याबाबत

**(४०) १०९८०९ (१२-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शहरांमध्ये विविध शासकीय कार्यालये, रुग्णालये शैक्षणिक इमारती, सिनेमागृह, मंगल कार्यालये यात महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षण उपाययोजना अधिनियमानुसार अग्निप्रतिबंधक उपाययोजना करणे आणि फायर ऑडीट प्रमाणपत्र वर्षातून दोन वेळा अग्निशमन अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील मालेगाव शहरातील बहुसंख्य शासकीय इमारती, सिनेमागृह, रुग्णालय, पोलीस ठाणे या इमारतींचा मागील अनेक वर्षापासून फायर ऑडीटच केले नसल्याची धक्कादायक बाब दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) होय.
(२) मालेगाव शहरातील बहुसंख्य शासकीय इमारती, सिनेमागृहे, रुग्णालय, पोलीस स्टेशन या इमारतींचे अग्नीलेखा परिक्षण झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये, स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येऊन अधिनियमाच्या कलम ६ व नियम ९(१) व कलम ८(२) व नियम ११(१) नुसार मालेगाव महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.
तसेच, सर्व संबंधितांकडे पाठपुरावा करुन अग्नीलेखा परिक्षण तात्काळ करुन घेण्याबाबत मालेगाव महानगरपालिकेस सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील २० पैकी १५ प्रतिष्ठित शासकीय कार्यालयांमध्ये डेंग्यू, मलेरिया आणि जपानी मेंदूज्वर यांचा प्रसार करणाऱ्या डास आणि अळयांची पैदास होत असल्याबाबत**

**(४१) १०९८९७ (१२-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील २० पैकी १५ प्रतिष्ठित शासकीय कार्यालयांमध्ये डेंग्यू, मलेरिया आणि जपानी मेंदूज्वर यांचा प्रसार करणाऱ्या डास आणि अळयांची पैदास होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेमार्फत किटकजन्य आजारांचा पादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी खालील उपाययोजना राबविण्यात येतात.
• पुरेसे कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येतात.
• जलपर्णीचे निर्मुलन करण्यात येतात.
• पुरेसा औषधसाठा उपलब्ध करुन देण्यात येतो, तसेच औषध फवारणी नियोजनबध्द रितीने करण्यात येते.
• प्रादुर्भाव रोखण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येते.
• डासोत्पदनाची ठिकाणे नष्ट करण्यात येतात.

• जन जागृती करण्यात येते. त्यामुळे पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये डास व आळयांची पैदास होत असल्यास त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरात २०१४-१५ या कालावधीत कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्पासाठी एकाच कंपनीला निविदा दिल्याबाबत

**(४२) १०९९०१ (१४-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात २०१४-१५ या कालावधीत कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्पासाठी एकाच कंपनीला निविदा दिल्याचा आरोप महानगरपालिका प्रशासनावर दिल्लीतील प्रतिस्पर्धी आयोगाने (कॉम्पिटिशन कमिशन ऑफ इंडिया) केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुसार लाभार्थी कंपनीस सहकार्य करणाऱ्या महानगरपालिका प्रशासकिय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) सन २०१४-१५ या वर्षात पुणे महानगरपालिकेमार्फत विकेंद्रित पध्दतीने ओल्या कचऱ्याचे विघटन करणारे प्रकल्प उभारण्यासाठी जाहीर निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती.
या निविदा प्रक्रियेविरुध्द नागरिक चेतना मंच पुणे, यांनी प्रतिस्पर्धी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.
प्रतिस्पर्धी आयोग (कॉम्पिटिशन कमिशन ऑफ इंडिया) यांच्या मार्फत सदर निविदा प्रक्रियेची चौकशी चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेतील अधिकारी पदपथावरील पेव्हिंग ब्लॉक गरज नसतानाही बदलत असल्याबाबत

**(४३) ११०१२३ (१९-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेतील अधिकारी पदपथावरील पेव्हिंग ब्लॉक बदलण्याची गरज नसतानाही एक-दोन वर्षांनी पेव्हिंग ब्लॉक बदलत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) पुणे शहरातील पदपथाची सुधारण कामे करीत असताना, तसेच सेवासुविधांची कामे करतानाच खराब झालेल्या पदपथावरील पेव्हिंग ब्लॉक बदलण्यात येतात. तसेच काही ठिकाणी सेवासुविधांची (उदा.केबल,पाईप लाईन) कामे करताना निघालेले जुने ब्लॉक सुस्थितीत असल्यास तेच ब्लॉक पुन्हा बसविण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेत काम करणाऱ्या अभियंत्यांना वाहतूक नियोजनाचे काम येत नसल्याबाबत**

**(४४) ११०१२९ (१८-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत काम करणाऱ्या अभियंत्यांना वाहतूक नियोजनाचे काम येत नसल्याचे कारण पुढे करत या कामासाठी सल्लागार, ठेकेदार तसेच अर्बन स्ट्रीट डिझायनर यांची नेमणूक करून चुकलेल्या उड्डाणपुलांचा खर्च सल्लागारांच्या मानधनातून वसूल करण्याऐवजी नागरिकांच्या पैशांनी याच सल्लागारांना प्रशिक्षण देण्याचा ठराव पुणे मनपाच्या स्थायी समितीसमोर ठेवण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) पुणे शहरातील वाहतूक नियोजनाबाबत अहमदाबाद येथील सी.ई.पी.टी. युनिव्हर्सिटीने दिलेल्या प्रस्तावानुसार केवळ पुणे महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणेकामी सी.ई.पी.टी. युनिव्हर्सिटी संस्थेस करारावर नेमणूक करणेस व त्या पित्यर्थ खर्च अदा करणेस स्थायी समिती, पुणे महानगरपालिका यांच्या दि. १०/१०/२०१७ ठरावान्वये मान्यता झालेली आहे.
यामध्ये सल्लागार व ठेकेदार यांचा अंतर्भाव असणार नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने केलेल्या फायर ऑडीटनुसार अनेक इमारतींनी आग प्रतिबंधक यंत्रणाच उभारली नसल्याबाबत**

**(४५) १११६९९ (१२-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कमला मिल सारखी दुर्घटना पुणे शहरात घडू नये याकरीता पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने केलेल्या फायर ऑडीटमध्ये अनेक इमारतींना आग प्रतिबंधक यंत्रणाच उभारली नसल्याची धक्कादायक माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवासी व्यावसायिक इमारती, शाळा, कॉलेज, हॉस्टेल, हॉटेल, लॉज, हॉस्पिटल, बेकरी अशा विविध आस्थापनांचे फायर ऑडीट करताना ५९७ इमारतींपैकी फक्त ४५० इमारतींना अग्निप्रतिबंधक उपाययोजना अपूर्ण असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मिळकतींना अग्निशमन दलाचे नाहरकत प्रमाणपत्र नसतानाही महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या वतीने सदर मिळकतींना परवानग्या दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अग्निशमन दलाचे नाहरकत प्रमाणपत्र न घेता सदर अस्थापनांना बांधकाम पूर्णत्व:चा परवाना देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार वा करित आहे,

(५) असल्यास, पुणे शहरात कायमस्वरूपी आगप्रतिबंधक उपाययोजना आस्थापनांनी निर्माण करण्याबाबत शासन कोणती यंत्रणा उभारणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) हे खरे असून, पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने दि. ०३ ते १३ जानेवारी २०१८ या कालावधीत केलेल्या फायर ऑडीटमध्ये ६१ आस्थापनांच्या जागेत अग्निशमन यंत्रणा केलेली नसल्याचे दिसून आले आहे.

(२) हे अंशतः खरे असून, पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने केलेल्या फायर ऑडीटमध्ये ३९१ इमारती/व्यवसायांच्या जागेत अग्निप्रतिबंधक उपाययोजना अपूर्ण, बंद स्थितीत असल्याचे आढळून आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) शासनाने राज्यामध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ लागू केलेला असून कोणत्याही इमारतीमध्ये पुरेशी अग्निशमन यंत्रणा करणे, ती कायम कार्यान्वित ठेवणे, तिची वेळोवेळी तपासणी करून घेणे ही इमारतीचे मालक/भोगवटादार यांची जबाबदारी असल्याचे या अधिनियमात नमूद आहे. तसेच अशी अग्निशमन यंत्रणा बसविणेसाठी सदर अधिनियमातील तरतुदीनुसार संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय तसेच पुणे महानगरपालिकेने लायसन्स अभिकरणांची नेमणूक केलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील स्वारगेट-नसरापूर (ता.भोर) - स्वारगेट या मार्गावर एकच बस असून ती बस दिवसातून पाच ते सहा फेऱ्या करीत असल्याबाबत**

**(४६) ११२१३६ (१२-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील स्वारगेट-नसरापूर (ता.भोर) - स्वारगेट या मार्गावर एकच बस असून ती बस दिवसातून पाच ते सहा फे-या करीत असल्यामुळे व्यापारी, कामगार, विद्यार्थी इ. ची यामुळे गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावर वाढलेली प्रवावशी संख्या लक्षात घेता या मार्गावर आणखी एक बस वाढविण्यात यावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळास दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी विनंती पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पत्राची दखल घेवून शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) गृह विभागाच्या अधिसुचना क्र.टीपीए/१२८९/१० परिवहन ३ टीआरअ/३ सन १९९१ नुसार शहरी बस वाहतुक ही महानगरपालिका हद्दीबाहेर २० कि.मी. त्रिज्या क्षेत्रापर्यंतच चालविण्यात यावी अशी मर्यादा घालुन दिलेली आहे.

नसरापुर ता.भोर हे गांव पुणे महानगरपालिका हद्दीपासुन २४ किमी अंतरावर असल्याने सदरचे क्षेत्र हे राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यक्षेत्रात येत आहे.

परंतु सन्माननीय स्थानिक विधानसभा सदस्यांकडून वारंवार झालेल्या सुचनांनुसार सदर मार्ग सुरु करण्यात आलेला आहे.

सद्या महामंडळास ना नफा ना तोटा या तत्वावर बससेवेचे संचलनाकरीता प्रति किमी ८५/- इतका खर्च येत असून मार्ग क्र.६१ नसरापुर ते स्वारगेट या मार्गावर संचलनात असणाऱ्या बसला प्रति किमी रुपये २९.७१ इतके अत्यल्प उत्पन्न प्राप्त होत आहे.

सदर मार्गाचे प्रति खेप भारमान फक्त ४० इतके अत्यल्प असल्याने सदर मार्गास प्रवाशांचा अत्यल्प प्रतिसाद असल्याचे दिसुन आले आहे त्यामुळे सदर मार्गावर बस वाढविणे तुर्त अडचणीचे आहे, हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत सन्माननीय स्थानिक विधानसभा सदस्यांनी दिनांक १७/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये सदर मार्गावर एक बस वाढविणेबाबत कळविले होते. त्यास अनुसरुन पुणे महानगर परिवहन महामंडळाने दिनांक ०३/०८/२०१७ अन्वये उलट टपाली कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील गंगापूररोड, सावरकरनगर, नरसिंहनगर, आकाशवाणी टॉवर परिसर, शांतीनिकेतन चौक इत्यादी ठिकाणी प्रशासनाच्या उदासिनतेमुळे रस्ता दुभाजक म्हणून ड्रम ठेवले असल्याबाबत**

**(४७) ११३१२५ (१८-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील गंगापूररोड, सावरकरनगर, नरसिंहनगर, आकाशवाणी टॉवर परिसर, शांतीनिकेतन चौक, प्रमोद महाजन उद्यानाच्या पाठीमागील चौकात प्रशासनाच्या उदासिनतेमुळे रस्ता दुभाजक म्हणून ड्रम ठेवले असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रात्रीच्यावेळी हे ड्रम दिसत नसल्यामुळे येथे सातत्याने अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाने येथील ड्रम हटवून येथे आकर्षक व योग्य आकारात रस्ते दुभाजक व वाहतूक बेट उभारण्यासोबतच येथे होणारे अपघात लक्षात घेता त्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१८) :** (१) नाशिक शहरातील रस्त्यांवर वाहतूक सुरळीत होण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी शहर वाहतूक शाखा व महानगरपालिका यांचे संयुक्त पाहणीनुसार रस्ता दुभाजक टाकणे किंवा वाहतूक बेट विकसित करणेबाबत निर्णय घेण्यात येतात.

त्यानुसार, शहरातील काही ठिकाणी वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्पुरते स्वरुपात ड्रम ठेवण्यात आले होते. यापैकी आवश्यकतेनुसार गंगापूर रोड, सावरकर नगर, नरसिंह नगर या ठिकाणी कायमस्वरुपी पध्दतीने कामे करण्यात आलेली आहेत.

तसेच, आकाशवाणी टॉवर, शांतिनिकेतन चौक्, प्रमोद महाजन उद्यानाच्या मागे अद्याप तात्पुरती व्यवस्था असून, ठेवण्यात आलेल्या ड्रमवर आवश्यक रंग देण्यात आलेले आहेत.

(२) नाही.

तात्पुरती व्यवस्था म्हणून ठेवण्यात आलेले ड्रम रंगविलेले असल्याने रात्रीच्या वेळी वाहनधारकांना दिसतात व ते रिकामे असल्याने धोकादायक नसतात.

(३) वाहतुकीची पाहणी करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ड्रम ठेवून, पाहणीच्या अंतिम निष्कर्षानुसार दुभाजकाची लांबी, वाहतूक बेटाचा आकार याबाबत निर्णय घेऊन अंतिम कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचे नियोजन महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथे महानगरपालिका क्षेत्रातील खुल्या जागा, विकास योजनेतील रस्ते, चौक आदींच्या मोजणीसाठी केलेल्या आक्षेपांबाबत

**(४८) ११३१३२ (१८-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे महानगरपालिका क्षेत्रातील खुल्या जागा, विकास योजनेतील रस्ते, चौक आदींच्या मोजणीसाठी आक्षेपांचा विचार न करता विशिष्ट मक्तेदाराला काम मिळावे या हेतूने सर्व्हेअर नियुक्तीच्या फेरनिविदेतही नुकसानकारक अटीशर्ती कायम ठेवण्यात आल्या असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने सन १९९९ पासून सदरील काम आतापर्यंत एकाच संस्थेमार्फत करवून घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने आतापर्यंत या कामांसाठी अदा केलेल्या देयकांची चौकशी करुन दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१८) :**(१) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सर्व्हेक्षणाची निविदा क्रमांक २/२०१७-१८ ही रद्द करण्यात आलेली असून, नव्याने निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) होय.

(३) सदर सर्व्हेक्षण कामांसाठी वेळोवेळी न्युनतम मंजुर दराने व कोटेशन मागवुन महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेऊन काम करुन घेण्यात आलेले आहे. त्यामुळे या प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव महानगरपालिकेचा हुडकोस एकरकमी परतफेडीचा पाठविलेला प्रस्ताव

**(४९) ११४९४९ (०३-०४-२०१८). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने जळगाव महानगरपालिकेचा हुडकोस एकरकमी परतफेडीचा १३ कोटी ५८ लाखांचा प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१८) :** (१) होय.

(२) जळगाव महानगरपालिकेचा एकरकमी परतफेडीचा प्रस्ताव हुडको यांचेकडून अमान्य करण्यात आला आहे.

तसेच, यासंदर्भात जळगाव महानगरपालिकेने मा.ऋण परिशोधन अपीलीय प्राधिकरणाकडे दाखल केलेले अपील प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेंतर्गत शासकीय अधिकाऱ्यांना घरकुल वाटप करुन केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(५०) ११५१९७ (१२-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक (जि.नाशिक) महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुल वाटपात शासकीय अधिका-यांना घरकुल वाटप करुन गैरव्यवहार केल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरकुल वाटप करतांना एकाच व्यक्तीच्या नावे दोन व अधिक घरकुलांचे वाटप करण्यात आले होते त्यात काही शासकीय अधिका-यांचा समावेश असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१८) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेमार्फत पारदर्शक प्रक्रिया राबवुन झोपडीधारकांना घरकुल योजनेअंतर्गत सदनिका वाटप करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**